Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-XI Nov. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

दलित रंगभूमीचे स्वरूप व प्रयोजन

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय,नळेगाव

'थांबा रामराज्य येतयं' हे दलित नाटक वर्गात विद्यार्थ्यांना शिकवताना जे सध्या दलित रंगभूमी विषयीचे वाचन केले. आणि बी.ए. द्वितीय वर्षाच्या वर्गात स्वतः अध्ययन करताना 'दलित रंगभूमी' यातील एकांकिकांचा अभ्यास केला होता त्याचाच आधार घेऊन मी या शोधनिबंधात दलित रंगभूमी आणि चळवळ यांच्यातील परस्पर संबंध, दलित रंगभूमीचे स्वरूप व प्रयोजन यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. 24 फेब्रुवारी 1983 रोजी पुणे येथे पहिले नाटयसंमेलन साजरे झाले. परंतु दलित साहित्यिक श्री सुरेश मेश्राम यांनी दलित रंगभूमीची ही चळवळ जूनीच आहे असे त्यावेळी झालेल्या एका चर्चेत म्हटलेले आहे. डॉ. आंबेडकरांच्या काळातच एक मोठे दलित संमेलन भरले होते असा पुरावाही श्री मेश्राम यांनी दिला आहे. दलित रंगभूमी या संस्थेची स्थापना व दलितेत्तर रंगभूमीची चळवळ यात तफावत असू नये असा इशारा दिला आहे. या नाटयसंमेलनात आयोजित केलेल्या विविध परिसंवादात अनेक दलित व दलितेत्तर विद्वानांनी दलित रंगभूमी विषयी जी मते मांडलेली आहेत त्यांचाही मागोवा घेण्यात आलेला आहे.

1) डॉ. भालचंद्र फडके :- ''प्रस्थापित मराठी रंगभूमीस तात्विक भुमिका नाही तिला सामाजिक बांधिलकीची जाणीव नाही.''
2) श्री मधुकर तुपलोंढे :- ''नटेश्वर हा प्रस्थापित रंगभूमीचे प्रतिक आहे तो तांडव नृत्य करीत असताना त्याच्या पायदळी मुल तुडवले जाते आहे तो नटेश्वर आमचा नाही.''
3) श्रीमती मुक्ता मनोहर :-''हिंदू धर्म वाचविण्यासाठी विष्णूदास भावे यांनी मराठी रंगभूमीची सुरूवात केली वरिष्ठ जातीच्या व श्रीमंताच्या हाती असलेली ही रंगभूमी स्थितीप्रिय व बंदिस्त आहे.''

वरील वक्तव्यावरून हे स्पष्ट होईल की, दलित नाटककार किंवा दलित रंगभूमी प्रस्थापित मराठी रंगभूमीस नाकारते. कारण त्यांच्यामते हिंदूधर्मीयांची जात्यंधताच प्रतिबिंबित झालेली आहे असे त्यांना वाटते. एकीकडे प्रस्थापित मराठी रंगभूमी नाकारताना आणि दुसरीकडे दलित रंगभूमीचा ऐतिहासिक मागोवा घेताना -

4) श्री टेक्सास गायकवाड :- ''नाटक कला मुळ दलितांचीच आहे. येथल्या मुळ द्रविड रहिवाशांची ती कला आहे. बाहेरून आलेल्या आर्यांनी ती चोरली. दानवांची नाटके पाहून देव (आर्य), मुर्च्छित पडत असत.'' भरतमुनीनेच असे लिहून ठेवले आहे. दानवांची नाटके पाहूनच भरताने स्वतःचे 'नाटयशास्त्र' रचले. सुप्रसिध्द दलित लेखक श्री शंकरराव खरात यांनी वरील मताला दुजोरा देताना म्हटले की, ''लोकसंगीत, भारूड व ललित या सारख्या लोककला मुळात येथील दिलत रहिवाशांच्या आहेत. नंतर मध्यमवर्गीयांनी त्या कला आत्मसात केल्या.''

1) दलित रंगभूमीचे प्रयोजन :-

पुण्यातील या नाटय संमेलनाच्या परिसंवादात हे स्पष्ट करण्यात आले की, दलितांचे उद्‌बोधन हे दलिनत रंगभूमीचे प्रयोजन आहे. आणि दलित रंगभूमीद्वारे सवर्णांना दलितांच्या तक्रारीची जाणीव मानवतेच्या एकंदर चर्चेवरून पुढील मत सवर्णांनाच मान्य आहे असे दिसते ते मत असे - दलित रंगभूमी प्रस्थापित मराठी रंगभूमीहून वेगळीच असली पाहिजे आणि तिचे नाटयशास्त्रही स्वतंत्र असले पाहिजे. याच नाटसंमेलनात दलितेत्तर नाटय समीक्षक डॉ. वि.भा. देशपांडे, डॉ. भालचंद्र फडके यांनीही दलित रंगभूमीच्या समीक्षेचे निकषही वेगळेच असले पाहिजे असे मत मांडले दलित रंगभूमी ही सर्वस्वी प्रचार प्रसारासाठी आहे. तिला कोणतेही कलात्मक निकष लावू नये असे त्यांचे मत आहे.

याच संमेलनात संप्रसिध्द लेखक विचारवंत व वक्ते 'झोतकार' प्रा. कसबे यांनी मात्र दलित रंगभूमीची वैचारिक भूमिका सुसूत्रपणे मांडली त्याचा विचार पुढील प्रमाणे थोडक्यात समजावून घेता येईल. प्रा. रावसाहेब कसबे म्हणतात, ''देशात सामाजिक परिवर्तनवादी चळवळी आहेत. त्यात दलित चळवळ ही एक आहे. दलित साहित्य दलित चळवळीचे अंग आहे आणि दलित रंगभूमी त्याचाच एक भाग आहे.'' प्राध्यापक कसबे यांच्या मते, ''प्रस्थापितांच्या संस्था येत्या 10 वर्षात मोडून पडणार आहेत रंगभूमी ही नवी संस्था आहे समाजात नव्या संस्था उभ्या करणा-यावर एक ऐतिहासिक जबाबदारी येऊन पडते. ही जबाबदारी म्हणजे त्या संस्था विश्वासार्ह बनविण्याचे होय. आणि ती जबाबदारी पेलण्यासाठी पुरेशा चिंतनाची सामाजिक बांधिलकीची जाणीव असण्याची अवश्यकता आहे.'' पुढे प्राध्यापक कसबे यांनी मराठी नाटय सृष्टीचा वेध घेताना हे स्पष्ट केले आहे की, ''मराठी नाटयसृष्टी फक्त व्यक्तीच्या सुख दुःखाचा विचार करते म्हणूनच मराठी नाटके फसतात. त्यांच्या मागे सामाजिक चिंतन नसते.'' प्राध्यापक कसबे यांनी पुढील विचार मांडलेला आहे तो म्हणतात, ''आपला प्रश्न व्यापक परिवर्तनाचा आहे. त्यासाठी संबंध व्यवस्थेचाच विचार केला पाहिजे. खरा आंबेडकरवादी कोण्या ब्राहमणाच्या विरोधात नाही. तो संबंध व्यवस्थेच्याच विरोधात आहे. त्यांचा दावा मूल्यरचनेबद्दल आहे.'' दलित रंगभूमी दुहेरी कार्य करते असे प्रा. कसबे यांना वाटते. तिला दलितांना जागे करायचे आहे. पण तिने केवळ जातीयवादी असून चालणार नाही. जातीयवाद सर्वत्र सारखाच आहे. दलित रंगभूमी दलितापर्यंत जाते. तशी ती सवर्णाकडे ही गेली पाहिजे. सवर्णांनाही बदलायचे आहे. आणि आपले शत्रू कमी करावयाचे आहे. दलित रंगभूमी सामाजिक क्रांतीकरील अशा भ्रमात राहू नये. कोणतेही क्रातीकारी साहित्य सामाजिक क्रांती करीत नाही. साहित्य फक्त क्रांतीची ज्योत पेटविते व ती तेवत ठेवते. क्रांती जनतेलाच करावी लागते. आणि त्यासाठी समाजामध्ये जनतेलाच चळवळ उभी करावी लागते.

श्रीमती गीताबाई गायकवाड :- या संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी यांनी आपल्या उद्‌घाटनीय भाषणात म्हटले की, ''दलित नाटकवाल्यांनी व्यापार मांडू नये त्यांनी अहंकारापासून व स्वार्थापासून अलिप्त राहावे. दलित रंगभूमीला सत्यशोधक जलसा व आंबेडकरी जलसा यांचा वारसा घेऊन पुढे गेले पाहिजे.''

या नाटयसंमेलनात नाटकाच्या कलात्मक निकषांची ही चर्चा झाली दलित साहित्यिक - सुरेश मेश्राम म्हणाले, ''दलित रंगभूमीवरील नाटक दलित जीवनाचे आणि प्रचारकी असले तरी ते 'नाटक' आहे. म्हणजे ते दृकश्राव्य कला आहे तेंव्हा कलेच्याकलात्मक निकषातून ते सूटू शकत नाही.'' याऊलट दलित नाटय समीक्षक डॉ. वि भा. देशपांडे व भालचंद्र फडके यांनी मात्र दलित रंगभूमीच्या समीक्षेचे स्वरूप वेगळेच आहे असे म्हटले आहे. ही मोठी गंमतीची गोष्ट होय.

2) दलित रंगभूमीची पार्श्वभूमी / प्रस्थापित रंगभूमीची पार्श्वभूमी :-

विष्णूदास भाव्यांनी सुरू केलेली मराठी रंगभूमी समृध्द आहे. गेल्या शंभर सव्वाशे वर्षापासून मराठी रंगभूमीचा विकास होत गेलेला आहे. 1856 च्या सुमारास विष्णूदास भावे यांनी मराठी रंगभूमीची सुरूवात केली 'अलल डुर्रर उर्फ थागडथोंब' या या भाव्यांच्या असंस्कारीत नाटकामध्येच भावी नाटकांची बीजे होती. त्या नंतर अण्णासाहेब किर्लोस्कर, गो. ब. देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर, खाडीलकर, राम गणेश गडकरी, प्र. के. अत्रे, वसंत कानेटकर, मो. ग. रांगणेकर, वि. वा. शिरवाडकर, चि. त्र्यं. खानोलकर, रत्नाकर मतकरी, महेश एलकुंचवार, गो. पु. देशपांडे, सतीश आळेकर या नाटककारांनी मराठी रंगभूमी घडविली आणि समृध्द केली.

प्रस्थापित मराठी रंगभूमीवर नाटयलेखनाची सुरूवात झाली राम गणेश गडकरी यांनी एकांकिका लेखनास सुरूवात केली आज एकांकिका हा नाटय प्रयोग लोकप्रियतेच्या संदर्भात आणि कलात्मकतेच्या संदर्भातही नाटकाच्या पुढे गेलं आहे. असे म्हटले तर वावगे होणार नाही. एकांकिका लेखनात अनंत कानेकर, विजय तेंडूलकर, चि. त्र्यं. खानोलकर, जयवंत दळवी, रत्नाकर मतकरी, रमेश पवार, चंद्रकांत देशपांडे इत्यादींनी मोलाची भर घातली.

3) नाटक व एकांकिका यांच्या स्वरूपातील साम्य व भेद :-

रूढ परंपरेप्रमाणे नाटक हा एक वाङमय प्रकार मानला जातो. कथा, कादंबरी या वाङमयप्रकारात लेखकाच्या निवेदनाला वाव आहे. आणि काव्य हा प्रकार तर पूर्णतः आत्मनिष्ठ आहे या तिन्ही प्रकारापेक्षा नाटकाचे स्वरूप अत्यंत निराळे आहे. वस्तूतः नाटक ही दृकश्राव्य अशी एक कला आहे. नाटकाची प्रयोगशीलता म्हणजेच त्याला लाभलेली दृश्यमानता होय. या वैशिष्टयामुळेच नाटक हा प्रकार एक वेगळीच कला मानली जाते. नाटकाचे संहितामूल्य (लिखित नाटक) आणि नाटकाचे प्रयोगमूल्य असा विचार अस्तित्वात आला. परंतु मराठी रंगभूमीच्या संदर्भात जेंव्हा नाटकाचा विचार केला जातो तेंव्हा नाटकाचे प्रयोगसंहिता मुल्य हा एकच निकष गृहित धरला जातो.

4) नाटकातील जीवनानुभवाचे स्वरूप :-

मूळात नाटकामध्ये जो जीवनानुभव साकार झालेला असतो तो अधिकाधिक निखळ विशुद आणि वस्तूनिष्ठ अशा स्वरूपात असतो म्हणूनच नाटककारास नाटयलेखनामध्ये निवेदन करण्याची मुभा अजिबात देत नाही. नाटकामध्ये जीवनानुभव किंवा नाटयानुभव स्वतःच बोलका होतो. म्हणूनच नाटककार म्हणजेच लेखकास संपूर्ण तटस्थता बाळगावी लागते. नाटकास त्या अनुभवाच्या घडण्याला केवळ साक्षी रहावे लागते हे विधान प्रथमदर्शनी चमत्कारी वाटण्याची शक्यता आहे. परंतु ती एक वस्तुस्थिती आहे. हे मान्य करावे लागते नाटकाचा म्हणजे त्यातील पात्रांच्या घटना प्रसंगाचा निर्माता स्वतः नाटककारच असतो. तरीही त्यात त्याला हस्तक्षेप करता येत नाही. म्हणूनच नाटककार त्या विकसनाला केवळ साक्षी राहावे. कथा कादंबरीच्या संदर्भात असेच बोलले जाते. परंतु कथा कादंबरी मधून लेखकाला निवेदनाचे समर्थनाचे मार्ग उपलब्ध असतात. चांगला लेखक या प्रकारचे निवेदन, समर्थन टाळण्याकडेच आपला कल ठेवतो. परंतु नाटकात मात्र अशी निवेदने टाळणे अपरिहार्य असते. म्हणून नाटक लिहिणे कवितेइतकेच कठीण आहे.

कविता आणि नाटक यांच्या स्वरूपामध्ये मुलतः फरक आहे. कारण कविता ही संपूर्ण आत्मनिष्ठ कृती असते. तर नाटक पूर्णतः वस्तूनिष्ठ कृती आहे. परंतु काव्यात्मकता, अल्पाक्षरत्व या संदर्भात मात्र कविता आणि नाटक यांचे नाते जवळचे आहे हे उपरोक्त निवेदन नाटकाचे केवळ संहिता मूल्यच लक्षात

घेऊन केले गेले आहे. परंतु नाटक म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाने घडणे आहे. म्हणून इतर वाङमय प्रकारापेक्षा नाटक ही कला निराळी मानली जाते.

5) नाटकाचे माध्यम संवाद :-

नाटक ही एक वेगळी कला असे मानले की, नाटक या कलेच्या माध्यमाचा प्रश्न उपस्थित होतो इतर संगीत चित्रादी ललित कलांचे माध्यम जसे निराळे आहे. म्हणजे नाटकामध्ये केवळ संवादाच्या आधारे नाटयानुभव अभिव्यक्त होत असतो. दोन किंवा अधिक व्यक्तीमधील संवाद स्वाभाविक असतात. या संवाद माध्यमाचे पूर्वनियोजन नाटककाराला करता येत नाही. पात्रांचे स्वभाव जर निश्चित झालेले असतात. तरी त्या स्वभावातील वळणे बदलतात हे मात्र निश्चित सांगता येत नाही. प्रत्यक्ष मानवी जीवनातील व्यक्तीच्या स्वभावासंबंधी जशी गूढता किंवा अनिश्चितता प्रत्ययाला येते त्याप्रमाणे नाटकातल्या व्यक्तीच्या संदर्भात खुद्द नटककारालाही अशी गुढता व अनिश्चितता वाटत असते. म्हणूनच नाटककार व्यक्तीच्या स्वाभाविक विकसनाला फक्त साक्षी राहतो. अशी गूढता किंवा निश्चितता यासाठी वाटते की, नाटकातल्या मात्रांची उक्ती (बोलणे) आणि त्यांची कृती यामध्ये मेळ असेलच असे नाही जीवनातल्या या सत्याला जो नाटककार साक्षी राहतो त्याचे नाटक श्रेष्ठ मानले जाते.

6) नाटकाची संहिता आणि नाटकाचे प्रयोगमूल्य :-

नाटकाची संहिता आणि प्रयोगमूल्य असा दुहेरी विचार नाटकाच्या संदर्भात संभवतो नाटककार, नाटक आणि प्रयोग यामध्ये सुसुत्रता येणे शक्य नाही. नाटककाराने लिहिलेले नाटक संहिता रूपाने नाटककारापासून वेगळे होते आणि तो प्रयोगाच्या स्वाधीन होतो. प्रत्यक्ष रंगभूमीवर नाटकाचा प्रयोग होतो त्यावरून नाटकाचे मूल्यमापन झाले पाहिजे असा विचार आज प्रबळ झालेला आहे. कारण ही रंगभूमीची कला आहे. आणि तीचा अविष्कार रंगभूमीवरच होतो. कारण दृश्यमानता (दिसणे) आणि श्राव्यता (ऐकणे) ही नाटकाची वैशिष्टये आहेत. म्हणून नाटक ही प्रत्यक्षाची कला आहे. आणि नाटकाला हे प्रत्यक्षाचे मुल्य मिळवून देताना चित्रसंगीत, नृत्य इतर शास्त्राच्या प्रकाशयोजना, ध्वनियोजना, रंगरंगोटी इत्यादी म्हणजे पदार्थ विज्ञानशास्त्र, वास्तू, कलाशास्त्र इत्यादी शास्त्रांची आवश्यकता असते या सर्व कला आणि शास्त्रांच्या आधारे सरूप (रूप लाभणे) ही एक वेगळीच कला मानावी व तिचा आंतरभाव साहित्यात करू नये असे मत अलिकडे सर्वमान्य झालेले आहे..

नाटकातून जीवनाचा एक व्यापक भाग अविष्कृत होतो तर एकांकिकामध्ये जीवनातील एखादाचा प्रसंग वा अनुभव व्यक्त होतो म्हणूनच अल्प अवकाशात थोडया वेळात साकार होऊ पाहणारी एकांकीका हा प्रकार गतिमान असतो. नाटकाचा एक अंक म्हणजे एकांकिका नव्हे कथा कादंब-याच्या अनुभवाच्या संदर्भात जे साम्य आढळते तेच नाटक आणि एकांकिका यामध्ये आहे. कथा ज्या प्रमाणे एक केंद्रिय स्वयंपूर्ण संघटन आणि गतीमान असते. त्यामुळे नाटकापेक्षा एकांकिकेमध्ये नाटयानुभवाचा दाब सातत्याने पेलून धरलेला दिसतो म्हणूनच कलात्मकतेच्या दृष्टीने एकांकीका नाटकापेक्षा अधिक सरस ठरू पाहते. लेखन आणि प्रयोग या दोन्ही दृष्टीने एकांकिका नाटय प्रकार अधिक यशस्वी झालेला दिसतो. एकांकिकेचे मूळ रूप म्हणजे नाटक. प्रसंगी नाटक सादर करण्यात येणारे 'फार्स' होय. पूर्वी इंग्रजीसोबत मराठी रंगभूमीवर जी नाटके सादर केली जात. नाटय प्रयोगाच्या अगोदरच नाटयगृहात येऊन बसणा-या प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी हे फार्स सादर केले जाते. त्यास इंग्रजीत 'इन्टरव्हयू' असे म्हटले जाई. मराठी

रंगभूमीवरसुध्दा याच प्रकारचे 'इंटर ल्यूड' किंवा दोन अंकातील मधल्या वेळेस सादर केले जात त्यालाच 'फार्स' असे म्हटले जाते आणि या फार्समधूनच एकांकिकेचा जन्म झाला आहे.

7) दलित रंगभूमी आणि एकांकिका :-

दलित रंगभूमीवर सादर करण्यासाठी नाटके फारसी लिहीली गेलेली नाहीत आंबेडकरी जलसा, आंबेडकरी गीते यांच्या मधूनच दलित रंगभूमी उभी राहीली दलितांच्या वेदनेत अभिव्यक्त करणे आणि दलितांच्या मनात विद्रोह निर्माण करणे हे दलित रंगभूमीचे प्रयोजन ठरले त्यासाठी दलित नाटककारांनी तमाशा या नाटयप्रकारचेही माध्यम वापरले. दलित रंगभूमीचे उपरोक्त उद्दिष्ट घेतले की, एकांकिका ही लघू आकाराची, सधन अनुभव देणारी आणि एककेंद्री परिणाम साधणारी असल्यामुळे नाटकापेक्षा उद्दिष्टपूर्तीसाठी दलित नाटककारांना एकांकिका हा नाटयप्रकार उपयुक्त वाटणे स्वाभाविक आहे.

अभावग्रस्त समाजाला रंगभूमी हा एक आधार आहे. आत्मशोधनासाठी आणि जीवनाच्या जागृतीसाठी रंगभूमीवरील दृश्य वाचकाच्या मनावर जितके खोलवर शिरेल तितके मुद्रीत साहित्याद्वारे ते शिरणार नाही. यासाठी दलितांना आपल्या चळवळीच्या समांतर एक कला चळवळ चालू ठेवण्यासाठी रंगभूमीचा आधार घ्यावा लागला आहे. अमेरिकेत निग्रो जमातीच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटविण्यासाठी ब्लॅक थिएटर ची निर्मिती केली गेली.

किसन फागू बनसोडे हे दलित रंगभूमीचे पहिले शिल्पकार मानले जाते. 'संत चोखामेळा' हे नाटक 'भट भटीणीचा संवाद', 'सनातन भरमाचा पंचरंगी तमाशा' (1932) ह्या त्यांच्या नाटयरचना महत्वाच्या आहेत. श्री बनसोडे यांनी आपल्या नाटय कृतीसाठी तमाशा हे परंपरा माध्यम वापरले त्यांना केवळ दलितांचीच जागृती करायची होती असे नव्हे तर त्यांना सवर्णाच्या मनातही बदल घडूवन आणायचा होता हे महत्वाचे आहे. केरू पवन गायकवाड यांनी 'शाळेतला फार्स', 'नवरा बायकोचा झगडा' हे वग लिहून त्याद्वारे दलितांचे दुःख व्यक्त केले. एवढेच नव्हे तर त्यांनी नाशिक जिल्ह्यात संस्था स्थापन केली आणि त्याद्वारे संगीत जलशांचे कार्यक्रम सादर केले. या संगीत जलशांच्या स्वरूपासंबंधी सुप्रसिध्द दलित साहित्यिक भिमराव कर्डक म्हणतात, ''जलसा म्हणजेअस्पृश्यांच्या माणूसकीच्या हक्कांचा इतिहास होय.'' कर्डकांनी 'सत्याग्रहाचा फार्स' व 'धर्मांतराचा फार्स' यांची रचना केली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातील कांही महत्वाच्या एकांकिका मानल्या गेल्या आहेत. नौकरीच्या जाळयात -प्रभाकर गणवीर, माणुसकीचे वेड-गंगाधर पानतावणे, मृत्यूपत्र - सुरेश वंजारी, पिंज-यातील पोपट व आवर्त-दत्ता भगत, ग्रामराक्षस- खुशाल कांबळे, नरबळी - कमलाकर डहाट, नातं - बाबूराव गायकवाड, डाग - नामदेव व्हटकर, युगयात्रा - म. भि. चिटणीस. या महत्वाच्या एकांकिका मानल्या गेलेल्या आहेत.भी. शि. शिंदे यांनी 'काळोखाच्या गर्भात' या नाटयकृतीमध्ये मराठवाडयात उसळलेल्या जातीय दंगलीच्या व संघर्षाच्या अनुभवाना नाटयरूप दिलेले आहे. भुमीपूत्र - भी. सी. शिंदे, घोटभर पाणी - प्रभाकर दुपारे, आधारस्तंभ - रामनाथ चव्हाण, आम्ही देशाचे मारेकरी - टेक्सास गायकवाड, आवर्त - दत्ता भगत

वरील सर्व एकांकिकामधून दलितांच्या जीवनातील भीषण समस्या मांडल्या गेल्या आहेत. दलितांच्या जीवनातील आगळया वेगळया वेदनेचा अविष्कार या एकांकिका मधून केला गेला आहे. वरीलपैकी कांही एकांकिका कलात्मकतेच्या सर्व निकषात उतरतात. आणि कांही एकांकिकाच्या अविष्कारात प्रति क्रियात्मकता आणि आक्रस्ताळेपणा आलेला आहे. असे असले तरी त्यात मांडलेल्या समस्या व दुःख मात्र नजरेआड होऊ शकत नाही हे विशेष होय.

संदर्भग्रंथ :-

1) कृ.बा.मराठे, मराठी रंगभूमीचा पूर्वरंग, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1979
2) डॉ. शिवदास शिरसाठ, दलित नाटक आणि दत्ता भगत यांचे नाटयविश्व, कैलास पब्लिकेशन, औरगांबाद, प्रथमावृत्ती, 2009
3) डॉ. बबन भाग्यवंत, दलित रंगभूमी आणि नाटक, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2008
4) डॉ. कृष्णा किरवले, दलित चळवळ आणि साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1996
5) मोतीराम कटारे, फुले आंबेडकरी साहित्य : साहित्य आकलन आणि आस्वाद, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2006
6) (संपादक) प्रा. यादव गायकवाड/डॉ. पृथ्वीराज तौर, नाटयवैभव, संस्कार भारती, लातूर, पृथमावृत्ती 2009.
7) भालचंद्र फडके, दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे पृथमावृत्ती, 1977

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com